गीता परिवार

# ॥ श्रीमद्भगवद्गीता शुद्ध उच्चारण मार्गदर्शिका- स्तर 3 ॥

## विशिष्ट स्वर व त्यांच्या मात्रा -

- 'ऋ' व 'ॠ' हे संस्कृत भाषेतील असे स्वर आहेत, की ज्याचे उच्चार करत असताना ते व्यंजनासारखे वाटतात परंतु हे स्वर वास्तवात व्यंजने नाहीत. त्यांच्या मात्रा ृ व ॄ आहेत. यातील प्रथम स्वर -हस्व तर द्वितीय स्वर दीर्घ आहे.

## जोडाक्षरात रफाराची स्थानानुसार मात्रा -

- 'र् वर्ण कोणत्याही वर्णासोबत आल्यास त्याचा दोन प्रकारे संयोग होतो. संयुक्त अक्षरात र् प्रथम आल्यास पुढच्या अक्षरावर र् (रफार) अशाप्रकारे लिहीले जाते. उदाहरणार्थ कर्म. जर दुसरे आल्यास अक्षराखाली ्र याप्रमाणे लिहीले जाते. उदाहरणार्थ- क्रम.

## संयुक्त वर्ण लिहीण्याची व त्यांचे उच्चार याची पद्धत-

संयुक्त वर्ण देवनागरीत दोन प्रकारे लिहीला जातो.

- पहिल्या पद्धतीत 'एका खाली दुसरा' अशाप्रकारे पहिले व्यंजन वर व नंतर क्रमानुसार खाली बाकी व्यंजने. – उदाहरणार्थ उद्भव.
- दुस-या पद्धतीत व्यंजने क्रमानुसार आहेत तशीच लिहीली जातात.  या दोन्ही पद्धतीत जो वर्ण आधी आहे त्याचा प्रथम व बाकी वर्णांचा क्रमशः उच्चार केला जातो. – उदाहरणार्थ- उद्‌भव


गीता परिवार चे साहित्य इतर कोणत्याही ठिकाणी वापरण्यासाठी पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

# संधी-नियम

दोन वर्ण एकत्र आले की संधी होते. जर एकत्र येणारे वर्ण स्वर असतील तर त्याला स्वरसंधी, व्यंजनं असतील तर व्यंजन संधी, अनुस्वार असतील तर अनुस्वार संधी व विसर्ग असतील तर विसर्ग संधी असे म्हणतात. संधी झाल्यावर एकत्र येणाऱ्या वर्णांपैकी एका किंवा बरेचवेळा दोन्ही वर्णांमध्ये परिवर्तन होते. या स्वर संधीच्या नियमांना आपण विस्तृतपणे पाहूया.

## स्वर किंवा अच् संधी-

स्वर संधी दोन स्वरांत होते. यात स्वरांचे परिवर्तन होते त्यामुळे त्याला स्वर संधी म्हणतात. याचे अनेक प्रकार आहेत.

### 1. दीर्घ संधी - अक: सवर्णे दीर्घ:

दोन सजातीय स्वर एकत्र आल्यास त्या दोन स्वरांच्या जागी त्यांचा सजातीय दीर्घ स्वर येतो.

| एकत्र येणारे दोन स्वर | | दोन्हीच्या जागी होणारा दीर्घ स्वर | उदाहरण |
|---|---|---|---|
| अ/आ | अ/आ | आ | भय्+अ+अभये= भयाभये (18/30) |
| इ/ई | इ/ई | ई | भ्रमत्+इ+इव = भ्रमतीव (1/30) |
| उ/ऊ | उ/ऊ | ऊ | तेष्+उ+उपजायते = तेषूपजायते (2/62) |
| ऋ/ॠ | ऋ/ॠ | ॠ | पित्+ऋ+ऋणम् = पितृणम्<br>गीतेत या संधीचा प्रयोग आलेला नाही. |

### 2. गुण संधी - आद्गुण:

संधी होणाऱ्या वर्णांत जर प्रथम वर्ण ' अ' अथवा 'आ' असेल व दुसरा वर्ण 'इ' ',उ,' 'ऋ' ,' ऌ ' (-हस्व अथवा दीर्घ) असेल तर त्या दोन्हीच्या जागी अनुक्रमे 'ए', 'ओ', 'अर्' आणि 'अल्' येतात.

| एकत्र येणारे दोन वर्ण | | दोन्ही च्या ठीकाणी होणारा गुणादेश | उदाहरण |
|---|---|---|---|
| अ/आ | इ/ई | ए | विगत्+अ+इच्छा = विगतेच्छा (5/28) |
| | उ/ऊ | ओ | पुर्+आ+उवाच = पुरोवाच (3/10) |
| | ऋ/ॠ | अर् | मह्+आ+ऋषीणाम् = महर्षीणाम् (10/2) |
| | ऌ | अल् | तव्+अ+लृकार: = तवल्कार:<br>गीतेत या संधीचा प्रयोग आलेला नाही. |


गीता परिवार चे साहित्य इतर कोणत्याही ठिकाणी वापरण्यासाठी पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

## 3. यण् संधी – इको यणचि

संधी होते अशा वर्णात जर प्रथम वर्ण 'इ' 'उ' 'ऋ'अथवा 'ऌ'-हस्व किंवा दीर्घ व दुसरा वर्ण कोणताही विजातीय स्वर असेल तर प्रथम स्वराच्या जागी अनुक्रमे 'य्' 'व्' 'र्' 'ल्' ही व्यंजने येतात व दुस-या स्वरा सोबत समाविष्ट होतात.

| एकत्र येणारे असे प्रथम वर्ण | एकत्र येणारे असे द्वितीय वर्ण | एकत्र आल्यावर प्रथम स्थानी होणारा यणादेश | उदाहरण |
|---|---|---|---|
| इ/ई | अन्य कोणताही स्वर | य् | कर्मण्+इ+एव = कर्मण्येव (2/47) |
| उ/ऊ | | व् | त्+उ+एवाहम् = त्वेवाहम् (2/12) |
| ऋ/ॠ | | र् | जाग्+ऋ+अति = जाग्रति (2/69) |
| ऌ | | ल् | लृ+आकृति: = लाकृति:<br>गीतेत या संधीचा प्रयोग आलेला नाही. |

## 4. वृद्धि संधी – वृद्धिरादैच्

संधी होणाऱ्या वर्णांत प्रथम वर्ण **'अ'** अथवा **'आ'** असेल व दुसरा वर्ण **'ए'** अथवा **'ऐ'** किंवा **'ओ'** अथवा **'औ'** असेल तर दोन्ही स्थानांवर क्रमशः **'ऐ'** व **'औ'** लिहीले जातात.

| एकत्र येणा-या वर्णात प्रथम वर्ण | एकत्र येणा-या वर्णात द्वितीय वर्ण | दोन्ही वर्णांच्या जागी होणारे वृद्धी उच्चार | उदाहरण |
|---|---|---|---|
| अ/आ | ए/ऐ | ऐ | सहस्+आ+एव = सहसैव(1/13) |
| | ओ/औ | औ | च् +अ+ओषधी: = चौषधी: (15/13) |

## 5. अयादी संधी – एचोऽयवायाव:

संधी मधील वर्णात समजा प्रथम वर्ण **'ए', 'ऐ'**, **'ओ'** अथवा **'औ'** आणि द्वितीय वर्ण '**कोणताही स्वर**' असेल तर प्रथम वर्णाच्या जागी क्रमशः **'अय्'**, **'आय्'**, **'अव्'** आणि **'आव्'** उच्चार द्वितीय स्वरा बरोबर केले जातात.

| एकत्र येणा-या वर्णात प्रथम वर्ण | एकत्र येणा-या वर्णात द्वितीय वर्ण | प्रथम वर्ण स्थानी होणारे अयादी उच्चारण | उदाहरण |
|---|---|---|---|
| ए | कोणताही स्वर | अय् | राजर्ष्+ए+अ: = राजर्षय: (4/2) |
| ऐ | | आय् | न्+ऐ+अका: = नायका: (1/7) |
| ओ | | अव् | मन्+ओ+ए = मनवे (4/1) |
| औ | | आव् | द्व्+औ+ इमौ =द्वाविमौ (15/16) |


गीता परिवार चे साहित्य इतर कोणत्याही ठिकाणी वापरण्यासाठी पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

### 6. पूर्वरुप संधी – एङः पदान्तादति

संधी मधील वर्णांत समजा प्रथम वर्ण **'ए'** अथवा **'ओ'** व द्वितीय वर्ण **'अ'** असेल तर दोन्ही स्थानी क्रमशः 'ए' व 'ओ' होतात. लुप्त झालेल्या 'अ' साठी अवग्रह ऽ चिन्ह लावतात.

| एकत्र येणा-या वर्णांत प्रथम वर्ण | एकत्र येणा-या वर्णांत द्वितीय वर्ण | दोन्ही वर्णांच्या स्थानी होणारा पूर्वरुप उच्चार | उदाहरण |
|---|---|---|---|
| ए | अ | एऽ | त्+ए+अभिहिता = तेऽभिहिता (2/39) |
| ओ | अ | ओऽ | दृष्ट्+ओ+अन्तः = दृष्टोऽन्तः (2/16) |

# सामान्य शब्दावली

- **वर्णमाला –**

**स्वर** - अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, ॠ, ए, ऐ, ओ, औ

**व्यञ्जन -**

- **कण्ठ्य** - क्  ख्  ग्  घ्  ङ्
- **तालव्य** - च्  छ्  ज्  झ्  ञ्
- **मूर्धन्य** - ट्  ठ्  ड्  ढ्  ण्
- **दन्त्य** - त्  थ्  द्  ध्  न्
- **ओष्ठ्य** - प्  फ्  ब्  भ्  म्

- **अंतस्थ**- ज्यांचा उच्चार जीभ, टाळू, दांत व ओठ यांच्यातील परस्पर संपर्कातून होतो, त्यांना अंतस्थ वर्ण म्हणतात. य्,र्,ल,व् हे अंतस्थ वर्ण आहेत.
- **ऊष्म** - ज्यांच्या उच्चारामुळे तोंडातून उष्णता बाहेर पडते त्याना उष्ण वर्ण म्हणतात. श्,ष्,स्,ह् हे उष्ण वर्ण आहेत.
- **मृदु व्यंजन-** पांच व्यंजन वर्गातील तिसरा,चौथा व पांचवा (ग्, घ्, ज्, झ्, ड्, ढ्, द्, ध्, ब्, भ्,) वर्ण व अंतस्थ (य्, र्, ल्, व्) वर्ण व ह् हे मृदु वर्ण आहेत.
- **कठोर व्यंजन –** पांच व्यंजन वर्गातील प्रथम व द्वितीय वर्ण (क्, ख्, च्, छ्, ट्, ठ्, त्, थ्, प्, फ्) व श्,ष्,स् हे कठोर व्यंजन होत.
- **अल्पप्राण व्यंजन** - ज्या व्यंजनांच्या उच्चारात अल्प श्वास सोडला जातो, त्यांना अल्पप्राण व्यंजन म्हणतात. क,ग,ङ,च,ज,ञ,ट,ड,ण,त,द,न,प,ब,म,य,र,व,ल
- **महाप्राण व्यंजन** - अशी व्यंजने जी उच्चारताना खूप प्रयत्न करावे लागतात व बोलताना जास्तीचा श्वास सोडला जातो, त्यांना महाश्वास व्यंजन म्हणतात.. ख,घ,छ,झ,ठ,ढ,थ,ध,फ,भ,श,ष,स,ह
- **जिह्वामूलीय** - 'क' व 'ख' याच्या पूर्वी येणाऱ्या अर्ध- विसर्गाला जिह्वामूलक (ख*) म्हणतात. ज्याचा उच्चार ख् प्रमाणे करतात.
- **उपध्मानीय** - 'प' व 'फ' अगोदर येणाऱ्या अर्ध-विसर्गाला उपध्मानीय (फ*) म्हणतात. ज्याचा उच्चार फ् असा केला जातो.

|| इती ||


गीता परिवार चे साहित्य इतर कोणत्याही ठिकाणी वापरण्यासाठी पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.